SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 DBEE Office: 0231-2609068
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– ४१६००४, महाराष्ट्र
दूरध्वनी :ईपीएबीएक्स ००९१-०२३१-२६०९००० संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ कार्यालय : ०२३१-२६०९०६८
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ई मेल coe@unishivaji.ac.in
Estd. 1962
NAAC 'A' ++ Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./ परीक्षा विभाग/ 337 दिनांक: 11 MAY 2021

# परिपत्रक

## अत्यंत तातडीचे /महत्वाचे आणि कालमर्यादित

### ( फक्त पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष / प्रथम सत्र प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता )

**सध्या कोविड बाधित रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये लागू करण्यात आलेली संचारबंदी व इतर निर्बंध विचारात घेता ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेणे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सद्यस्थितीत उचित होणार नाही त्यामुळे सर्व परीक्षा सद्यस्थितीत ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.**

सबब, ज्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष / प्रथम सत्र प्रवेशित विद्यार्थ्यांनी विद्यापीठामार्फत घेण्यात येणा—या हिवाळी सत्र २०२० करीता यापूर्वी ऑफलाईन पध्दतीने परीक्षेचा पर्याय निवडलेला आहे अशा सर्व ( विद्यापीठ अधिविभाग/संलग्नित महाविद्यालये/दूरशिक्षण केंद्राकडील ) विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देण्यासाठी पर्याय निवडण्यासाठी दि. १५/०५/२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत खालीलप्रमाणे लिंकचा पर्याय विद्यार्थी स्तरावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

Web Page ⇨ online.unishivaji.ac.in
⇨ Winter 2020 Imp links for students
Link ⇨ Update students mobile No, E-mail ID for online examination

तरी ऑफलाईन पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व समाजाच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ऑनलाईन पध्दतीचा पर्याय उपरोक्त संगणक प्रणालीमध्ये सादर करावा. निवडलेल्या पर्यायाची पोहोच पावती /Confirmation Receipt ची प्रिंट विद्यार्थ्यांनी सोबत ठेवावी. तसेच संबंधित अधिविभाग/महाविद्यालयाने ऑफलाईन पध्दतीने परीक्षेच्या पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणेबाबत व वरील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लिंकमधून पर्याय सादर करणेसाठी आपले स्तरावरुन अवगत करण्यात यावे.

(टिप — अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार (Engineering, Pharmacy, Architecture, Law, Education & M.B.A) या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पध्दतीने होत असल्याने सदर विद्यार्थ्यांच्या नोंदी या लिंकमध्ये करण्यात येवू नयेत )

आपला विश्वासू,

प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति —

१) मा. विभागप्रमुख/ संचालक/समन्वयक, पदवी व पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२) मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये,
३) मा. संचालक, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४) आय टी सेल — योग्य त्या सुविधा उपलब्ध करणेबाबत.